# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

# दिनांक ११.०९.२०२१ (शनिवार)

## खुन

१)पोस्टे उमरेड :– मौजा रेल्वे स्टेशन झोपडपटटी मंगळवारीपेठ उमरेड ०२ कि.मी. पुर्व येथे दिनांक ०५.०९.२०२१ चे १६.०० वा. ते १८.०० वा. दर. यातील फिर्यादीचा भाऊ मृतक नामे ग्याना रूपराव शेंडे वय २२ वर्ष, रा. मंगळवारीपेठ उमरेड हा दिनांक ०५.०९.२०२१ रोजी १६.०० वा. घरी कोणालाही काही न सांगता घरून निघुन गेला दिनांक ०६.०९.२०२१ रोजी पर्यत फिर्यादी व त्याचे नातेवाईकांनी शोध घेतला असता मिळुन आला नाही. व घरी परत आला नसल्याने फिर्यादी श्याम रूपराव शेंडे, वय ३० वर्ष, रा. रेल्वे स्टेशन झोपडपटटी मंगळवारपेठ उमरेड यांने मृतक याचे मिसींग बाबत पोस्टे उमरेड येथे मिसींग क्र. ४९/२१ अन्वये नोंद करण्यात आली. सदर मिसींगचे चौकशी दरम्यान फिर्यादी व पोलीसांनी मिसींग मुलाचा शोध घेतला असता मिसींग चौकशी दरम्यान दिनांक १०.०९.२०२१ रोजी यातील फिर्यादीने पोस्टे ला तक्रार दिली की, आरोपी १) सुरजित मांडले, वय ३० वर्ष, २) सुकडू उर्फ विजय करतुले वय २२ वर्ष दोन्ही रा. रेल्वे स्टेशन झोपडपटटी मंगळवारपेठ उमरेड यांनी संगनमत करून फिर्यादीचे मिसींग भावाचा ग्याना रूपराव शेंडे याचा घातपात करून खुन केला आहे. व प्रेताची विल्हेवाट लावली आहे. सदर गुन्हयाचा तपासात आरोपीतांची कसुन चौकशी केली असता त्यांनी मृतकास लाकडी दांडयाने जिवानाशी मारून मृतकास पोत्यात भरून एक दिड किमी. अंतरावर पोता सायकल वर ठेवुन प्रेताची विल्हवाट लावणेकरीता आमराई जंगलात जावुन केबल च्या गड्डयात मृतकास टाकुन त्यात माती टाकुन पुरावा नष्ट केल्याने सदर आरोपीविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे लेखी रिपोर्टवरून पोस्टे उमरेड येथे आरोपीविरूध्द कलम ३०२, २०१, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक यशवंत सोलसे हे करीत आहे

## खुनाचा प्रयत्न

१) पोस्टे कुही :– मौजा उटी शिवार २५ किमी पश्चिम येथे दिनांक ०९/०९/२०२१ चे १९/०० वा ते १०/०९/२०२१ चे ०९/०० वा.दरम्यान फिर्यादी मनोहर जगनजी आत्राम वय ५१ वर्षे,रा.उटी.पोस्ट. चांपा, ता.उमरेड जि.नागपुर यास कोणीतरी अज्ञात व्यक्तीने जख्मी इसम श्री. दिपांतर बृजोन मंडल वय ३० वर्श रा. दिनकर नगर, अर्जुनी मोरगांव, जि. गोंदिया यास अज्ञात कारणावरून कोणत्यातरी हत्याराने डोळयाच्या मागच्या बाजुस व चेहऱ्यावर मारून जिवानिशी ठार करण्याच्या उद्देशाने गंभिर जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादीचे लेखी रिपोर्टवरून पोस्टे कुही येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०७ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास सहा.पोलीस निरीक्षक बाबुराव राऊत हे करीत आहे

## जबरी चोरी

१)पोस्टे सावनेर :– अंतर्गत नाईक लेआऊट प्लॉट नं.६५ सावनेर येथे दिनांक १०/९/२०२१ चे १२:४० वा.ते १२:४५ वा.सुमारास फिर्याद सौ.दिपा उल्हासराव सुपले वय ४४ वर्ष रा.नाईक लेआऊट प्लॉट नं.६५ सावनेर हि आपले मैत्रिण सुनंदा निमकर हिचे घरी गौरी विसर्जनाच्या कार्यक्रमासाठी गेल्या होत्या गौरी विसर्जनाचा कार्यक्रम आटपून आपले मैत्रिण सोबत आपले घराबाहेर गेटसमोर रोडवर आली असता तिचे गळयातील २५ ग्रॅम सोन्याचे मंगळसुत्र अडीच तोळे किंमती ७२,००० रू. ज्यात २ डोरले,४ डोल मणी सोन्याच्या तारामध्ये असलेले एका लाल रंगाच्या स्कुटीवरील लाल शर्ट घातलेला व तोंडाला निळा रंगाचा दुपट्टा बांधलेल्या एका अनोळखी ईसमाने जबरदस्तीने फिर्यादीचे गळयातुन हिसकावुन चोरी करून नेल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे लेखी रिपोर्टवरून पोस्टे सावनेर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३९२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे हे करीत आहे

## जनावर चोरी

१)पोस्टे मौदा :– अंतर्गत ७ किमी अंतरावर मौजा नगरधन दक्षिण येथे दिनांक ०९/०९/२०२१ चे १०/३० वा. ते १०/९/२०२१ चे ०२/३० वा. येथील फिर्याद नामे अविनाश अरविंद कुरमतकर वय ३२ वर्षे रा. केसोरी आंबाडी ता. कामठी हे रात्री जेवन करून आपल्या बकऱ्या कोठ्यात बांधुन झोपला असता रात्री दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने कोठ्यात बांधुन ठेवलेल्या दोन बकरी प्रत्येकी ५००० रू प्रमाणे कीमती १०००० रू व तिन बकरे प्रत्येंकी १०००० रू प्रमाणे किमती ३०,००० रू असा एकुण किमती ४०,००० रू चा माल चोरून नेल्याच्या फिर्यादीच्या तोंडी रीपोर्ट वरून सदर गून्हा नोंद

सदर प्रकरणी फिर्यादीचे लेखी रिपोर्टवरून पोस्टे मौदा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास सहा.पोलीस निरीक्षक सोनेकर हे करीत आहे

## विनयभंग

१) पो.स्टे. कन्हान :– मडीबाबा कॉलनि क्वाटर नं. ५२७ कामठी खदान ५ किमी पश्चिम येथे दिनांक १०/०९/२०२१ चे १६/३० ते १६/४५ वा. आरोपी सुभाषचद्र विश्वास गुप्ता वय ५७ रा न्यु कॉलनि टेकाडी टाउनशिप कन्हान हा फिर्यादी वय ४२ वर्षे, रा. खदान नं. ३ मडीबाबा हे फिर्यादीचे घरात अनाधिकृत प्रवेश करून फिर्यादी व तिच्या मुलगा याला माझा विरूद्ध पोलीसात तक्रार का केली? या कारणावरून अश्लिल भाषेत शिवीगाळ करून खोटया गुन्हयात फसविण्याची धमकी दिली तसेच आरोपी याने फिर्यादीला लज्जा वाटेल अशा प्रकारे नग्न करण्याचा उदेशाने साडी ओढुन खाली पाडण्याचा प्रयत्न केला त्यावरून फिर्यादी याचे दोन्ही मुलांनी बिचबचाव करून आरोपीला घराबाहेर काढले, असे फिर्यादीचे तोडी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कन्हान येथे नमुद आरोपी विरूध्द कलम ३५४, ३५४ (अ), ३५४ (ब), ४४८, ५०४, ५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा तपास पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक श्री. आत्राम हे करीत आहे.

## दुखापत

१) **पो.स्टे. नरखेड :–** पोस्टे पासुन ०१ किमी नरखेड येथे दिनांक ०९/०९/२०२१ चे २२/३० ते २३/०० वा दरम्यान यातील फिर्यादी हा दि. ०९/०९/२१ रोजी आपला भाउ यांचा टीफीन घेवुन काम करतो त्या रेल्वे कॉलनी येथे गेले असता तेथे काम करनारे चारही आरोपी दारूच्या नशेत आरडा ओरड करत होते, म्हणुन फिर्यादीने व भावाने त्यांना ‘‘आरडा ओरड करू नका’’ असे म्हटले असता आरोपी १)नरेश शिंदे रा.रेल्वे कॉलनी नरखेड २)रोनॉल्ड लॉरेन्स रा.नागपुर, ३)राजेश पांडे रा. रेशीमबाग नागपुर, ४)गौतम गौरखेडे रा. रेशीमबाग नागपुर यांनी चिडुन फिर्यादी यास शिवीगाळ करून हातबुक्यानी मारण्यास सुरवात केली तेव्हा फिर्यादीच्या भावाने झगडा सोडवायचा प्रयत्न केला असता रेनाल्ड लॉरेंस याने कामावरील ठेवलेला फावडा घेवुन फिर्यादीला पाठीवर मारले तसचे फिर्यादीला सुध्दा फावडा मारून जखमी केले व शिवीगाळ केल्याने सदर गुन्हा नोंद

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो.स्टे. नरखेड येथे नमुद आरोपी विरूध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा तपास पुढील तपास पोलीस हवालदार श्री. मनोज गाढवे हे करीत आहे.

२) **पो.स्टे. काटोल:–** अंतर्गत शनिचौक मांतगपुरा काटोल १.५ किमी पश्चिम येथे दिनांक ०५/०९/२०२१ चे १०/०० वा दरम्यान यातील फिर्यादी मुकेश संजय संतापे वय १९ वर्षे रा.शनिचौक मांतगपुरा काटोल हा आपले भाउ दादु संतापे व चंचल अडागळे यांचा आपसात वाद सुरू असल्याने बघण्यास गेला असता आरोपी यश उर्फ योगेश शिवाजी अडागळे रा.शनिचौक मांतगपुरा काटोल १.५किमी पश्चिम याने फिर्यादी यास ‘तु इथे काय बघत आहे’ म्हणुन वादविवाद केला व फिर्यादी यास हातभुक्कीने नाकावर मारून जखमी केले. व पुन्हा मारण्याची धमकी दिली. त्या बाबत पोलीस स्टेशन येथे येवुन रिपोर्ट दिली असता प्राथमिक उपचाराकरीता ग्रामीण रूग्नालय काटोल येथे नेले मा. वैदयकीय अधिकाऱ्यांनी व प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी मेयो हॉस्पिटल नागपुर येथे रेफर केले होते. फिर्यादी हा आज रोजी पोलीस स्टेशनला नागपुर येथील उपचाराचे कागदपत्र घेवुन आल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्टवरून सदर गुन्हा नोंद

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे नमुद आरोपी विरूध्द कलम ३२५, ५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा तपास पुढील तपास पोलीस हवालदार श्री. दलाल हे करीत आहे.

# निष्काळजीपणा वाहन चालविणे

**१) पो.स्टे. कन्हान :–** अंतर्गत कन्हान येथे दिनांक ०९/०९/२०२१ चे ११/०० ते ११/१० वा. यातील जखमी फिर्यादी अमृतलाल अनुराम गितलहरे रा. पंचशिल बौध्द विहाराजवळ सिहोर पारशिवनी, कन्हान हा आपले साक्षदार मित्रासह मोटर सायकल क्र.एम.एच ३१ डीबी ७६५६ स्पेंलडर ने मागे बसुन कन्हान कडुन भरघाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन कन्हान कडुन कामठी कडे जात असताना मोटार सायकलला उजव्या बाजुने धडक दिल्याने जखमी व त्याचा साक्षीदार मित्र रोडवर खाली पडले त्या धडकेमुळे जखमी याचा उजव्या हाताला जबर मार लागुन फॅक्चर झाले आले. जखमी हा उपचारकामी मेयो हॉस्पीटल येथे भरती असुन यातील अज्ञात आरोपी चालकाने अपघाताची माहिती पोलीसांना न देता जखमीचा वैद्यकीय मदत न देता घटना स्थळावरून पळून गेला. जखमी यांचे बयानावरून व वैद्यकीय रिपोर्टवरून सदर गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कन्हान येथे नमुद अज्ञात आरोपी विरूध्द कलम २७९, ३३८ १८४, १३४ (अ), १३४ (ब) भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा तपास पुढील तपास पोलीस हवालदार श्री. दलाल हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर.**